दै. पुण्यनगरी

# तोतया पोलिसाला पकडले; साडेसहा लाखांचा मुद्देमाल जप्त



**नांदेड :** सर्वसामान्य जनतेत जाऊन लोकांना फसवणूक करण्याच्या हेतुने आपण स्वतः पोलिस असल्याची बतावणी करणारा आणि व लॉटरी लागली असल्याचे आमिष दाखवणाऱ्या अनेकांना फसवणाऱ्या महाठगास नांदेड स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी रविवारी दि. ५ नोव्हेंबर रोजी दुपारी अटक केली आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, नांदेड जिल्ह्यात आपण पोलीस असल्याची बतावणी करुन आणि लॉटरी लागल्याचे आमिष दाखवून फसवणूक केल्याप्रकरणी सन २०२२ व २०२३ साली गुन्हे दाखल झाले होते. सदर गुन्ह्यातील आरोपीचा शोध घेण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक जगदीश भंडरवार यांना निर्देशित केले होते. या कामासाठी भंडरवार यांनी स्थागुशाचे पथक नियुक्त केले होते. या पथकाने शहरात फरारी व वॉन्टेड असलेले आरोपी शोध कामी पथक रवाना केले होते. सदर पथकातील पोलिस उपनिरीक्षक दत्तात्रय काळे यांना एका आरोपीबाबत माहिती मिळाली. या माहितीची खातरजमा करीत त्याचा माग काढला. पोलिस असल्याची बतावणी करुन आणि लॉटरी लागल्याचे आमिष दाखवून फसवणूक करणारा हा आरोपी सोने चांदी विक्रीसाठी इतवारा बाजारात येणार असल्याची खात्री पटल्यावर या पथकाला कुख्यात राहुलसिंग मनोजसिंग जोगीया (२४ मूळ रा.नामपल्ली हैदराबाद, ह.मु.वसरणी नांदेड) हा आढळून आला. त्यास पंचासमक्ष ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्याने विविध गुन्ह्यातील सहभागाची कबुली दिली. या कबुलीत जुलै २२ मध्ये हदगाव, वजिराबाद पोलिस ठाणे हद्दीत आपण वृध्दांना पोलिस असल्याची बतावणी करीत आणि जुलै २३ मध्ये मुदखेड व ऑक्टोबर २३ मध्ये लिंबगाव ठाणे हद्दीत वृध्दास लॉटरी लागल्याची बतावणी करुन फसविल्याची कबुली त्याने दिली. त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे ७४ ग्रॅम सोने, ७० तोळे चांदी, ३ मोबाईल, दुचाकी असा मुद्देमाल आढळला. एकूण ६ लाख ४१ हजार ७१७ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदर आरोपीस पुढील तपास कामी लिंबगाव पोलिस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले. अधिक तपास सुरु आहे.

ही कारवाई पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलिस अधीक्षक अविनाश कुमार, डॉ.खंडेराव धरणे यांच्या मार्गदर्शनात स्थागुशाचे पोलिस निरीक्षक जगदीश भंडरवार,सपोनि रवी वाहुळे,सपोनि पांडुरंग माने,उपनिरीक्षक दत्ता काळे, सचिन सोनवने, पोहेकॉ गंगाधर कदम, पोहेकॉ संग्राम केंद्रे, पोकॉ मारोती मोरे, मोतीराम पवार, रणधीर राजबन्सी, ज्वालासिंग बावरी, हानमंत बोडके, गजानन बयनवाड, चालक कलिम यांनी केली. पोलिस अधिकाऱ्यांनी या चमूचे कौतुक केले आहे.